!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९५ १६/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# भुमिगत गटार योजना आणि समांतर जलवाहिनीच्या निधीसाठी आवश्यक ती मदत करु

### केंद्रिय शहर विकास मंत्रालयाच्या सचिव व अप्पर सचिवांचे खासदार चंद्रकांत खैरे यांना आश्वासन

## खासदार चंद्रकांत खैरे यांचे केंद्रिय शहर विकास मंत्रालयाच्या सचिवांना निवेदन

**दिल्ली ( ता.१९ ) :** भुमिगत गटार योजना आणि समांतर जलवाहिनी योजनेच्या निधी मिळवण्यासाठी आवश्यकती मदत करु असे आश्वासन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांना केंद्रिय शहर विकास मंत्रालयाचे सचिव मधुसूदन प्रसाद आणि अप्पर सचिव निरज मंडलोई यांनी दिले. युआयडीएसएसएमटी अंतर्गत भुमिगत गटार योजनेचा दुसरा हप्ताचा निधी मिळावा व समांतर जलवाहिनीचा केंद्राकडील निधी मिळावा यासाठीचे निवेदन खासदार चंद्रकांत खैरे यांनी केंद्रिय शहर विकास सचिव मधुसूदन प्रसाद यांना दिले.

अमृत योजनेमुळे भुमिगत गटार योजनेच्या दुसऱ्या हप्तावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे चित्र होते. त्यामुळे योजनेचे काम मंदावल्याचे लक्षात येताच शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी सोमवारी बैठक घेतली होती. त्या संदर्भात त्यांनी आज दिल्ली येथे शहर विकास मंत्रालयाच्या सचिव आणि अप्पर सचिवांसोबत बैठक घेतली. युटीलायजेशन सर्टिफिकेट मिळाल्यानंतर दुसऱ्या हप्ताच्या निधी देण्यात येणार असल्याचे शहर विकास मंत्रालयाच्या सचिव मधुसूदन प्रसाद यांनी सांगितले. या संदर्भात स्थापन झालेल्या पाच राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या कमिटीकडे विनंती करणार असल्याचेही ते म्हणाले. यावेळी महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता अफसर सिद्दीकी व प्रकल्प अधिकारी समीर जोशी यांची उपस्थिती होती.

भुमिगत गटार योजना ३६५. ६९ कोटींची होती टेंडर किंमत वाढल्याने ४६४ कोटींची योजना झाली त्यात केंद्रिय शहर विकास मंत्रालयाकडून २९२.५५ कोटी तर राज्य शासन ३६.५७ कोटी व महानगरपालिका ३६.५७ कोटी रुपये देणार होती. त्यात मंजुर योजना व निविदेची वाढलेली किंमत त्यात ९८.३१ कोटीचा ही फरकांची रक्कम नियमानुसार लवकरातलवकर मंजुर करावी असे खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. समांतर जलवाहिनी संदर्भात ही खासदार चंद्रकांत खैरे यांनी निवेदन सादर केले आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहर विकासासाठी भुमिगत गटार योजना व समांतर जलवाहिनी या योजना पूर्ण होणे अत्यंत गरजेचे असुन निधी अभावी योजना रखडू नये व योजनांचा कामांना गती मिळावी यासाठी आपण प्रयत्न करावे अशी विनंती ही निवेदनात करण्यात आली आहे.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन/ गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525